दयानंद शिक्षण संस्था, लातूर संचलित

# दयानंद कला महाविद्यालय, लातूर

दयानंद शिक्षण संस्था,लातूर

आ नो भद्रा: क्रतवो यन्तु विश्वत:

# मासिक ई-मॅगझीन

JAN 2026

## महिना : जानेवारी २०२६

**महाविद्यालयात<br>आयोजित विविध शैक्षणिक, सांस्कृतिक,<br>क्रीडा व सामाजिक उपक्रमांचा आढावा सादर करणारे<br>मासिक ई-मॅगझीन.**

















No : 12345678900000000000

# श्रीमती श्वेता नागणे मनपा यांच्या हस्ते दयानंद कलात संकल्प पत्राचे वितरण

दयानंद कला महाविद्यालयात ईएलसी च्या वतीने मतदार जागरूकता व सहभाग कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ शिवाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे यांनी केले होते.मतदान प्रक्रियेमध्ये मतदारांचा जागरूक व सक्रीय सहभाग वाढावा, यासाठी भारतीय निवडणूक आयोगाने सुरू केलेल्या स्वीप उपक्रमांतर्गत हा कार्यक्रम बविण्यात आला.

या कार्यक्रमात शिक्षणाधिकारी (मनपा) तथा स्वीपच्या नोडल अधिकारी श्रीमती श्वेता नागणे यांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांशी संवाद साधताना स्वीप कार्यक्रमाचा मुख्य उद्देश मतदान प्रक्रियेविषयी जनजागृती करणे, मतदान प्रक्रियेचे सखोल ज्ञान प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचवणे तसेच सामान्य मतदारांचा सहभाग वाढवून लोकशाहीला खऱ्या अर्थाने लोकसहभागात्मक बनविणे हा आहे. याच अनुषंगाने लातूर महानगरपालिका निवडणुक 2026 च्या निमित्ताने शहरभर शाळा व महाविद्यालयांच्या माध्यमातून विविध मतदान जनजागृतीपर उपक्रम राबविले जात आहेत.

त्यांनी विद्यार्थ्यांना मतदान जनजागृतीपर मार्गदर्शन करताना सांगितले की, आधुनिक काळात अनेक मतदार मतदानासाठी घराबाहेर पडत नाहीत, त्यामुळे मतदानाची टक्केवारी लक्षणीयरीत्या घटत चालली आहे. ही बाब लोकशाहीसाठी चिंताजनक आहे.

प्रत्येक तरुण मतदाराने स्वतः मतदान करणे तर आवश्यक आहेच, पण त्याचबरोबर इतर नागरिकांनाही मतदानासाठी प्रेरित करणे ही आपली नैतिक जबाबदारी आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले. तरुणांनी या जबाबदारीची जाणीव ठेवून मतदान प्रक्रियेत सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

तसेच विद्यार्थ्यांना मतदान जनजागृतीसाठी संकल्पपत्राचे वितरण करण्यात आले. या प्रसंगी विद्यार्थ्यांनी लोकशाही बळकट करण्यासाठी मतदान प्रक्रियेत सक्रीय सहभाग घेण्याचा संकल्प व्यक्त केला.

या कार्यक्रमात विस्तार अधिकारी श्री मधुकर ढमाले, श्री सतीश भापकर, श्री सतीश चव्हाण, पर्यवेक्षक डॉ. प्रशांत दीक्षित, डॉ. मच्छिंद्र खंडागळे, प्रा जिगाजी बुद्रुके, प्रा. महेश जंग्गापल्ले व विद्यार्थी उपस्थित होते.



# दयानंद कला महाविद्यालयात महिला व सायबर सुरक्षेवर विशेष व्याख्यान संपन्न

स्त्री शिक्षणाच्या जननी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीचे औचित्य साधून येथील दयानंद कला महाविद्यालयात 'महिला सुरक्षा व सायबर सुरक्षा' या विषयावर विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. या प्रसंगी पोलीस निरीक्षक इंद्रजीत वर्धन व गणपत जाधव यांनी विद्यार्थ्यांना कायदेशीर संरक्षण आणि डिजिटल साक्षरतेबाबत मोलाचे मार्गदर्शन केले.
कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी, उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे आणि डॉ. प्रशांत दीक्षित यांची प्रमुख उपस्थिती होती.




महिला सुरक्षेवर मार्गदर्शन करताना पोलीस निरीक्षक इंद्रजीत वर्धन म्हणाले की, मुलींनी आपल्या सुरक्षिततेबाबत अत्यंत सजग असणे काळाची गरज आहे. स्वतःबाबत कोणताही अनुचित प्रकार घडल्यास मनात भीती न बाळगता त्वरित पोलीस प्रशासनाशी संपर्क साधून तक्रार नोंदवावी. कायद्यानुसार १८ वर्षांखालील सर्व मुले समान पातळीवर असतात, त्यामुळे लिंगभेदापलीकडे जाऊन कायद्याचे स्वरूप समजून घेणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी गुन्हेगारी प्रवृत्तीकडे न वळता आपले संपूर्ण लक्ष उज्ज्वल करिअर घडवण्यावर केंद्रित करावे, असा सल्लाही त्यांनी यावेळी दिला.
सायबर सुरक्षेबाबत बोलताना श्री. गणपत जाधव यांनी सोशल मीडियाच्या धोक्यांविषयी विद्यार्थ्यांना सतर्क केले. आपला वैयक्तिक डेटा मोबाईलमध्ये सुरक्षित नसतो, हे सांगताना त्यांनी स्पष्ट केले की, अनोळखी व्यक्तींशी चॅटिंग करणे किंवा संशयास्पद संदेशांना प्रतिसाद देणे टाळावे. जर मोबाईलवर चुकीचे मेसेज किंवा फोन येत असतील, तर त्याबाबत लपवाछपवी न करता तात्काळ पालक, शिक्षक किंवा पोलिसांची मदत घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले.
अध्यक्षीय भाषणात उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे यांनी बदलत्या काळात मुला-मुलींनी सजग राहून सोशल मीडियाचा वापर कौशल्याने करावा, असे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा: सुरेश क्षीरसागर यांनी केले, तर आभार प्रा. दशरथ ननवरे यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. सुधीर गाडवे, प्रा. महेश जंगापल्ले आणि श्री. धोंडीराम कोळी यांनी विशेष परिश्रम घेतले. या व्याख्यानास महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठीच्या विभागस्तर स्पर्धा दयानंद कला महाविद्यालयात संपन्न



राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, मुरुड ता. जि. लातूर द्वारा शिक्षक, अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठी शैक्षणिक वर्ष 2025-26 पासुन विविध स्पर्धाचे आयोजन करण्यात येत आहे. 2025-26 विभागस्तर स्पर्धा दयानंद कला महाविद्यालय लातूर येथे रविवार दिनांक 21 डिसेंबर 2025 रोजी संपन्न झाल्या.

या स्पर्धेत राज्य मंडळाच्या अधिनस्त सर्व शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था, अनुदानित, अंशतः अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच शिक्षण विभागाच्या पर्यवेक्षीय यंत्रणेतील अधिकारी, कर्मचारी लातूर नांदेड व धाराशिव येथे तालुकास्तरीय स्पर्धा होऊन त्यातून गुणानुक्रमे आलेल्या स्पर्धकांची विभागीय स्पर्धा घेण्यात आली यात सर्व तालुक्यातून 200 स्पर्धक सहभागी झाले होते.

विभागीय स्पर्धेत जवळपास 13 कलाप्रकार यात वैयक्तिक नृत्य, नाटक, योग, रांगोळी, स्वरचित काव्य, वक्तृत्व, वादविवाद, पीपीटी, एक्सेल, वर्ल्ड ॲनिमेशन, कथाकथन, स्वरचित काव्य, सुगम गायन व संगीत वाद्य वादन या स्पर्धांचे आयोजन डायटचे प्राचार्य डॉ. मारुती सलगर यांच्या मार्गदर्शनाखाली दयानंद कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांच्या सहकार्याने स्पर्धा समन्वयक अधिव्याख्याता प्रा.अनिल जाधव व उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे यांनी केले.

या स्पर्धेसाठी तीनही जिल्ह्यातून तज्ञ परीक्षकांची नियुक्ती करण्यात आली होती. परीक्षकांनी राज्यस्तरीय स्पर्धेसाठी या सर्व स्पर्धेतून स्पर्धकांची निवड केली.

डायटचे वरिष्ठ अधिव्याख्याता डॉ.विजयकुमार सायगुंडे, डॉ.जगन्नाथ कापसे, डॉ.अंजली सूर्यवंशी, अधिव्याख्याता श्री. घनश्याम पोळे, श्रीमती निलोफर पटेल, श्रीमती सुचित्रा जाधव व गिरीश माने तसेच विषय तज्ञ व विषय शिक्षक यांचे सहकार्य लाभले.

# कॉटन सॅनिटरी पॅड वापरणे आरोग्य व पर्यावरणासाठी आवश्यक – डॉ. अंजली जोशी

दयानंद कला महाविद्यालयाच्या अंतर्गत तक्रार निवारण समितीच्या वतीने आणि प्राचार्य डॉ शिवाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनानुसार,'मासिक पाळीतील सॅनिटरी पॅड जनजागृती' या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत कॅन्सर मुक्त भारत अभियान अंतर्गत सौ. मोनिका सूर्यवंशी व सौ. स्मिता शिरोळे यांनी कॉटन सॅनिटरी पॅडचे महत्त्व स्पष्ट केले.




कार्यशाळेत बाजारात मिळणाऱ्या नामांकित कंपन्यांच्या सॅनिटरी पॅड्स व कॉटन पॅड्स यांची तुलनात्मक प्रात्यक्षिके सादर करण्यात आली. प्लास्टिकयुक्त पॅड्समुळे महिलांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ शकतो, तसेच खाज, इन्फेक्शन व त्वचारोगासारख्या समस्या निर्माण होतात, असे यावेळी सांगण्यात आले.

समारोपप्रसंगी अध्यक्षीय भाषणात डॉ.अंजली जोशी (उपप्राचार्य, दयानंद कला महाविद्यालय) यांनी प्लॅस्टिकचा वापर टाळून कॉटन पॅड्स वापरण्याचे आवाहन केले. प्लास्टिक पॅड्स पर्यावरणासाठी घातक असून त्यांची विल्हेवाट योग्य पद्धतीने लावणे आवश्यक आहे, असेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाची प्रस्तावना व सूत्रसंचालन डॉ. दुर्गा शर्मा यांनी केले, तर आभारप्रदर्शन डॉ. अंजली जोशी यांनी केले. कार्यक्रमास महाविद्यालयातील महिला प्राध्यापक, प्रशासकीय महिला कर्मचारी व विद्यार्थीनी यांची बहुसंख्येने उपस्थित होती.

# मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा निमित्त
# दयानंद कला महाविद्यालय 'बोलींचा जागर' कार्यक्रम संपन्न







19.01.2026 रोजी दयानंद कला महाविद्यालयात भाषा संचालनालय, महाराष्ट्र राज्य आणि दयानंद कला महाविद्यालय मराठी विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी भाषा संवर्धन पंधरवाडा निमित्त बोलींचा जागर या विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. भाषा संचालनालयाने बोली जगवा, बोली वाचवा ! संस्कृती टिकवा ! या घोषवाक्यास अनुसरून महाराष्ट्रातील 36 जिल्हयांमध्ये विद्यापीठांच्या व महाविद्यालयांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. लातूर जिल्हयातून या कार्यक्रमासाठी दयानंद कला महाविद्यालयाची निवड महाराष्ट्र शासनाने केली होती.

सकाळी 09 ते 10.30 या वेळेत ग्रंथ दिंडी आणि शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते. कमचारी आणि विद्यार्थ्यांनी पारंपरिक वेशभुषा परिधान करून शिवाजी चौक ते महाविद्यालय असा शोभायात्रेत सहभाग नोंदविला.

बोलींचा जागर या विशेष कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवाजी गायकवाड होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून देगलूर महाविद्यालय, देगलूर येथील मराठी विभाग प्रमुख प्रा.डॉ.विठ्ठल जंभाले आणि महाराष्ट्र महाविद्यालय निलंगा येथील डॉ. हंसराज भोसले, उपप्राचार्य डॉ.अंजली जोशी उपस्थित होते. मार्गदर्शन करताना डॉ.हंसराज भोसले यांनी महाराष्ट्र आणि कर्नाटक सीमा भागातील मराठी बोली या विषयावर प्रकाश टाकला. सीमा भागातील बोलींचे स्वरूप, वाक्यप्रचार, म्हणी, शब्दातील लय आणि व्याकरण त्यांनी सप्रमाण सिद्ध करून दाखवले. तर मराठी भाषेतील मराठवाडी बोली या विषयावर डॉ. विठ्ठल जंभाले यांनी मार्गदर्शन केले.

शासनाच्या वतीने निर्धारीत केलेल्या कार्यक्रमानुसार महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी महाराष्ट्राची लोककला कार्यक्रमाचे सादरीकरण केले. यामध्ये पोवाडा, भारूड, शेतकरी गीत आणि पारंपरिक गोंधळ या कला प्रकारांचा समावेश होता. प्रा.अंगद भुरे यांनी मराठवाडा बोलीतील कवितेचे सादरीकरण केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी भाषा संचालनालयाचे श्री. भारत जाधव यांनी केले. कार्यक्रमासाठी शासनाचे प्रतिनिधी म्हणून स.या.महाजन आणि राहुल सुर्यवंशी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संयोजक म्हणून प्रा.डॉ.सुभाष कदम यांनी संपूर्ण जबाबदारी पार पाडली. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन मराठी विभाग प्रमुख डॉ. सुनीता सांगोले यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. डॉ. अंकुश चव्हाण, प्रा.राजू मोरे, प्रा.अंगद भुरे, प्रा.विद्या गिराम, प्रा. स्नेहा वाघमारे, डॉ.दिलीप नागरगोजे, प्रा. प्रशांत दीक्षित

# कॉटन सॅनिटरी पॅड वापरणे आरोग्य व पर्यावरणासाठी आवश्यक – डॉ. अंजली जोशी

दयानंद कला महाविद्यालय, लातूर येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने "शाश्वत विकासासाठी युवक : जलसंधारण व्यवस्थापन आणि ओसाड भूमी विकास"या विषयावर विशेष निवासी वार्षिक युवक शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबिर २५ ते ३१ जानेवारी २०२६ या कालावधीत मौजे तळेगाव, ता. शिरूर अनंतपाळ, जि. लातूर येथे पार पडत आहे.







या शिबिराचा उद्घाटन समारंभ रविवार, दि. २५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. डॉ. शिवाजी गायकवाड (प्राचार्य, दयानंद कला महाविद्यालय, लातूर) हे होते. उद्घाटक म्हणून मा. डॉ. मारोती गायकवाड (संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड) उपस्थित होते.

प्रमुख पाहुणे म्हणून मा.संजय पंचगल्ले (सहाय्यक शिक्षण संचालक व विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालय, लातूर), मा.अक्षय व्यंकटराव पाटील (सरपंच मौजे तळेगाव), प्रा.विजय गवळी यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी, महाविद्यालयाच्या उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी, उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे, प्रा. डॉ. संदीपान जगदाळे यांची उपस्थिती होती.

शिबिराच्या माध्यमातून जलसंधारण, वृक्षारोपण, ग्रामस्वच्छता, जनजागृती, पर्यावरण संवर्धन यांसारख्या उपक्रमांद्वारे युवकांमध्ये सामाजिक बांधिलकी आणि पर्यावरणाविषयी जागरूकता निर्माण करण्याचा उद्देश आहे.

कार्यक्रमाचे संयोजन रा.से.यो. कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. सुभाष कदम, प्रा. डॉ. रामेश्वर खंदारे, प्रा. अनिल भुरे व प्रा. सिद्धार्थ भालेराव यांनी केले आहे. शिबिरात सहभागी स्वयंसेवक मोठ्या उत्साहाने विविध सामाजिक उपक्रमात सहभाग घेत आहेत. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनुशा पिठले या स्वयंसेविकेने केले.

# मासिक ई-मॅगझीन

## महिना : जानेवारी २०२६

संपर्क
दयानंद कला महाविद्यालय, लातूर
ईमेल : daclatur@rediffmail.com वेबसाईट : www.daclatur.org

आभार
या ई-मॅगझीनच्या निर्मितीसाठी सहकार्य करणाऱ्या सर्व शिक्षक,
विद्यार्थी व कर्मचारी यांचे मनःपूर्वक आभार.